# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०–२५६०१२२३
०२०–२५६०१३५३
०२०–२५६०१२६३

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
naac@unipune.ac.in
iqac@unipune.ac.in

संदर्भ क्र.:– अंगुसिक/अभाउशिसका/६९३ दिनांक – ०५/१२/२०१८

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
सर्व संलंग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे ४११००७.

विषय – **अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (A.I.S.H.E.) मध्ये शैक्षणिक वर्ष सन २०१८–१९ ची माहिती भरणेबाबत.**

संदर्भ – मा. संचालक, मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त ईमेल, दि. ०४/१२/२०१८.

महोदय/महोदया,

प्रतिवर्षाप्रमाणे मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून भारतातील तसेच महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षणाबाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी **सन २०१८–१९** या शैक्षणिक वर्षाची सांख्यिकी माहितीची अत्यंत आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हयामधील व दादरा नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशातील अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानीत महाविद्यालयांकडून व परिसंस्थांकडून माहिती मागविण्यात येत आहे.

**ज्या महाविद्यालयांनी व परिसंस्थांनी अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (A.I.S.H.E.) मध्ये शैक्षणिक वर्ष सन २०१८–१९ मधील माहिती पूर्णपणे भरलेली आहे, अशा सर्व महाविद्यालये व परिसंस्थांनी विभागाचे संदर्भ पत्र क्र. अंगुसिक/अभाउशिसका/६४५, दि. २४ ऑक्टोबर, २०१८ नुसार ऑनलाईन पध्दतीने अर्ज करून ना–हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक आहे, याची महाविद्यालयांच्या/परिसंस्थांच्या नोडल अधिका–यांनी नोंद घ्यावी.**

सदरील माहिती शासनास अत्यावश्यक असून महाविद्यालयांनी व परिसंस्थांनी **दि. १० जानेवारी, २०१९** पर्यंत पूर्ण माहिती भरणे बंधनकारक असून लवकरात लवकर पूर्ण करून सहकार्य करावे. यासंदर्भात काही अडचणी आल्यास महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी उच्च शिक्षण संचालनालय, पुणे येथील दूरध्वनी क्रमांक ०२०–२९७०७०९३ व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष, ०२०–२५६०१२२३, २५६०१३५३ यांच्याशी संपर्क साधावा.

आपला,

(मुं. वि. रासवे)
सहायक कुलसचिव,
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष